(इंग्रजी छापलेल्या न्यायनिर्णयाचे मराठीत भाषांतर)

प्रकाशनयोग्य

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात
दिवाणी/नागरी अपिलीय अधिकारिता

दिवाणी अपील क्र.४५९७/२०१९
(एस.एल.पी.(दिवाणी)क्र.८४९४/२०१८ यामधून उद्भवणारे)

महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे सचिवांमार्फत .....अपिलार्थी
विरूध्द
संदीप श्रीराम वर्दे आणि इतर .....उत्तरवादी

सह

दिवाणी अपील क्र.४५९८—४६०१/२०१९
(एस.एल.पी.(दिवाणी)क्र.११६२६—२९/२०१९ यामधून उद्भवणारे)
(दैनंदिनी क्र.३०४२२/२०१७)

महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे सचिवांमार्फत .....अपिलार्थी
विरूध्द
सुहास सुधारकराव लव्हेकर आणि इतर .....उत्तरवादी

दिवाणी अपील क्र.४६०२/२०१९
(एस.एल.पी.(दिवाणी)क्र.११६३१/२०१९ यामधून उद्भवणारे)
(दैनंदिनी क्र.२०९५९/२०१८)

अशोक तुकाराम बर्डे .....अपिलार्थी
विरूध्द
महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे सचिवांमार्फत व इतर .....उत्तरवादी

न्यायनिर्णय

न्या. नवीन सिन्हा

विलंब क्षमापित. परवानगी दिली.

२. ज्या उमदेवारांना औषध संशोधन व विकास व चाचणी या क्षेत्रातील आवश्यक वर्षाचा (कालावधीचा) अनुभव आहे असे उमेदवार देखील दिनांक ४/०१/२०१२ व ३१/०३/२०१५ च्या वेगवेगळया जाहिरातीअन्वये, सहाय्यक आयुक्त (औषधे) व औषध निरिक्षक या पदावर नियुक्तीसाठी पात्र मानण्यात येतील, या उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे अपिलकर्ते व्यथित झाले आहेत.

३. अपीलार्थींच्या विद्वान वकिलांनी असे म्हणणे सादर केले, की नियुक्तीसाठी, शैक्षणिक पात्रतेसह, औषध निर्मिती व चाचणी, या क्षेत्रातील आवश्यक तेवढया वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव, अत्यावश्यक आहे. संशोधन व विकास प्रयोगशाळेतील संशोधनाचा अनुभव ही इष्ट पात्रता होती, ज्यायोगे सदर व्यक्ती (उमेदवार) फक्त प्राधान्य मिळण्यापुरताच पात्र ठरला असता. नंतरचा अनुभव हा नियुक्तीसाठी विचारात घेतला जावा अशा अत्यावश्यक पात्रतेसोबत एकसमान किंवा समतुल्य म्हणून विचारार्थ घेता येऊ शकत नाही. उच्च न्यायालयाने जाहिरात वाचून, इष्ट पात्रता हीच अत्यावश्यक पात्रता आहे असा अर्थ लावण्यात चूक केली आहे.

४. उत्तवारदींच्या विद्वान वकिलांनी असे म्हणणे सादर केले की ते पदव्युत्तर पदवी (एम.फार्म) होते आणि प्रयोगशाळेत औषधांच्या चाचणीसह

संशोधन व विकाससाचा तीन वर्षाहून अधिक अनुभव त्यांच्याकडे होता. ते देखील नियुक्तीसाठी विचारात घेण्यास पात्र होते आणि यासाठी गठीत केलेल्या समितीने त्यांच्या कागदपत्रांची छाननी केल्यानंतर आणि त्यांचा विचार करण्याकरिता ते पात्र आहेत अशी शिफारस केल्यानंतर त्यांना निवड प्रक्रियेसाठी बोलवण्यात आले होते. एकदा त्यांना जाणीवपूर्वक निवड प्रक्रियेत भाग घेण्याची परवानगी दिल्यानंतर ते विचारात घेण्यास अपात्र आहेत असे जाहिर केले जाऊ शकत नाही याकरिता औषधी द्रव्य व सौंदर्यप्रसाधने अधिनियम १९६१ (यानंतर त्याचा उल्लेख ''सदर कायदा'' असा करण्यात आला आहे) कलम ३ (फ) मधील उत्पादन प्रक्रियेच्या व्याख्येचा आधार घेतला होता. याव्यतिरिक्त दुसरे कोणतेही मुद्दे पक्षकारांनी उपस्थित केले नव्हते.

५. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणाने (यापुढे त्याचा उल्लेख 'सदर न्यायाधीकरण' असा केला आहे.) त्यांच्या ओ.ए.नं.८२०/२०१३ मध्ये असा निर्णय दिला आहे की संशोधन आणि विकास प्रयोगशाळेतील निर्मिती किंवा चाचणी क्षेत्रातील अनुभव हा सध्याच्या भरतीसाठी अनुभव म्हणून संबोधला जाऊ शकत नाही. सदर अनुभव हा फक्त उमेदवारास, मूलभूत पात्रता व औषध निर्मिती व चाचणी क्षेत्रातील आवश्यक अनुभव धारण करण्याच्या अधीन राहून प्राधान्य मिळण्यास पात्र ठरवू शकतो.

६. उच्च न्यायालयाने, रिट याचिका क्र.६६३७/२०१४ व यासारख्याच इतर प्रकरणांमध्ये न्यायाधिकरणाचा निर्णय फिरविताना असा निर्णय दिला आहे की ज्या उमेदवारांकडे प्रयोगशाळेतील औषधी द्रव्यांची चाचणी व संयोगीकरण या क्षेत्रातील संशोधनाचा अनुभव आहे त्याला, संशोधनातील

त्याचा अनुभव, उत्पादनातील अनुभवाशी निगडीत नाही, या कारणावरून संधी नाकारणे म्हणजे अर्थाचा विपर्यास करण्यासारखे आहे. ज्या उमेदवाराकडे प्रयोगशाळेतील औषधी द्रव्यांची चाचणी आणि संयोगीकरण या क्षेत्रातील अनुभव आहे त्याला पात्रतेच्या अटींचा चुकीचा अर्थ लाऊन संधी न नाकारता, प्राधान्य देणे गरजेचे होते. नामांकित प्रयोगशाळांमध्ये केलेले संशोधनकार्य हे औषधनिर्मितीच्या उद्देशाने होते.

उच्च न्यायालयाने, त्यांच्यासमोर दाखल झालेल्या रिट याचिका क्र. ७९६०/१६ मध्ये सदर आदेशाचे पालन केलेले आहे.

७. आंम्ही, सादर केलेल्या संबंधित निवेदनांचा विचार केलेा आहे. प्रथम सदर कायदयातील कलम ३ (फ) आणि जाहिरातींचे सार लक्षात घेणे सुज्ञ ठरेल.

''३(फ) कोणतीही औषधी द्रव्ये (किंवा सौंदर्यप्रसाधने) यांच्या संदर्भात 'उत्पादन' या शब्दाच्या व्याख्येमध्ये, कोणतेही औषधी द्रव्य अथवा सौंदर्यप्रसाधन, विक्री किंवा वितरणाच्या उद्देशाने तयार करण्यासाठी, त्यात फेरफार करण्यासाठी, ते शोभीवंत करण्यासाठी, परिपूर्ण करण्यासाठी, त्याचे आवेष्टन करण्यासाठी, त्यावर माहीतीचा कागद लावण्यासाठी, ते वेगळे करण्यासाठी अथवा त्यावर प्रक्रिया करण्यासाठी किंवा त्याचा स्विकार करण्यासाठी, असलेली कोणतीही प्रक्रिया किंवा प्रक्रियेचा भाग याचा समावेश असेल परंतु, सामान्यपणे किरकोळ विक्रीसाठी, कोणत्याही औषधी द्रव्याचे मिश्रण करणे किंवा तयार करून देणे अथवा कोणत्याही औषधी द्रव्याचे अगर सौंदर्य प्रसाधनाचे आवेष्टन करणे याचा त्यात समावेश नसेल आणि उत्पादन करणे याचा त्याप्रमाणेच अर्थ लावावा

८. दिनांक ०४/०१/२०१२ रोजीच्या जाहिराती नुसार, सहाय्यक आयुक्त

(औषधी द्रव्य) या पदासाठी अर्हता खालीलप्रमाणे आहे:

''(ब) खालीलप्रमाणे विहित केलेली पात्रता व अनुभव असणे आवश्यक आहे:

(i) कायदयाने स्थापन झालेल्या भारतातील विद्यापीठाची औषधनिर्मिती किंवा औषधनिर्माण विदयाविषयक रसायनशास्त्र अथवा चिकित्सालयीन औषधशास्त्र किंवा सूक्ष्मजीवशास्त्र या विषयातील विशेषज्ञतेसह वैदयकशास्त्रातील पदवी, आणि

(ii) औषधी द्रव्यांचे उत्पादन किंवा चाचणी या क्षेत्रातील अर्हता प्राप्त केल्यानंतर मिळवलेला अनुभव किंवा या कायदयातील तरतुदींच्या अंमलबजावणीचा किमान पाच वर्षांचा अनुभव.''

९. औषध निरिक्षक या पदासाठीची जाहिरात खालीलप्रमाणे आहे.

''खंड ४.५ — कायदयाने स्थापन झालेल्या भारतातील विद्यापीठाची औषधनिर्मिती किंवा औषधनिर्माण विदयाविषयक रसायनशास्त्र अथवा चिकित्सालयीन औषधशास्त्र किंवा सूक्ष्मजीवशास्त्र या विषयातील विशेषज्ञतेसह वैदयकशास्त्रातील पदवी, आणि

''खंड.४.६ — वरील खंड (i) मध्ये नमुद केल्याप्रमाणे औषधांचे उत्पादन किंवा चाचणी, या क्षेत्रातील अर्हता प्राप्त केल्यानंतर मिळवलेला प्रत्यक्ष अनुभव किंवा (सदर) कायदयातील तरतुदींच्या अंमलबजावणीचा तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीचा प्रत्यक्ष अनुभव.

खंड ४.७ — ज्या उमेदवारांनी खंड ४.५ मधे नमुद केलेल्या

विषयामध्ये पदव्युत्तर पदवी मिळवलेली असेल किंवा ज्यांच्याकडे औषधी द्रव्यांचे संश्लेषण व चाचणी यामधील संशोधन क्षेत्रातील अनुभव असेल त्यांना प्राधांन्य देण्यात यावे.

१०. संबंधीत पदावर नियुक्ती करण्यासाठीच्या अत्यावश्यक त्या अर्हता नियोक्त्याने ठरवावयाच्या आहेत. नियोक्ता हा कोणतेही प्राधान्य देण्यासह अतिरीक्त किंवा इष्ट पात्रता विहित करू शकतो. कामाचे स्वरूप व नियोक्त्याच्या गरजांनुसार उमेदवाराकडे कोणत्या आवश्यक अर्हता असाव्यात याबाबत सर्वोत्तम निर्णय फक्त नियोक्ताच घेऊ शकतो. न्यायालय पात्रतेच्या अटी घालून देऊ शकत नाही. फारतर, अर्थ समाण्याच्या दृष्टीने सदर जाहिरातीच्या पुर्नलेखनातबाबत, इष्ट अर्हता आणि अत्यावश्यक अर्हता या एकसमान असाव्या या मुद्दयाचा सखोल अभ्यास न्यायालय करू शकेल. समानतेचा प्रश्न सुध्दा न्यायिक पुनर्विलोकनाच्या कार्यक्षेत्राबाहेरचा आहे. जाहिरातीमधील भाषा आणि नियम जर स्पष्ट असतील, तर न्यायालय त्यात न्यायनिवाडा करत बसणार नाही. जाहिरातीमधे काही संदिग्धता असल्यास किंवा ती एखादया कायदयाच्या किंवा सदर नियमाच्या विरूध्द असल्यास, सदर प्रकरण, कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करावा अशा यथायोगय आदेशान्वये नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे परत जाणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकरणात न्यायालय, न्यायीक पुर्नविलोकनाच्या नावाखाली, नियोक्त्यासाठी काय सर्वोत्तम ठरविण्याकरिता, प्राधिकाऱ्याच्या भुमीकेत जाऊन (खुर्चीत बसुन), जाहिरातीमधील सोप्या भाषेतील अटींचा विरूध्द अर्थ लावू शकत नाही.

११. वास्तविक, जेव्हा तज्ञ समीतीची स्थापना झाली आहे आणि ज्या

समितीने, उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यापूर्वि त्यांच्या कागदपत्रांची तपासणी केली आहे, ती, अपात्र उमेदवाराला, नियुक्तीसाठी पात्र म्हणुन पुढे पाठवण्याकरिता, जाहिरातीमधील स्पष्ट अटिंच्या विरोधात काम करू शकणार नाही.

१२. जाहिरातीचा सरळ व स्पष्ट अर्थ असा होतो की औषधनिर्मिती किंवा औषधनिर्माणविदयाविषयक रसायन शास्त्र किंवा वैदयक शास्त्रातील, चिकित्सालयीन औषधशास्त्र किंवा सुक्ष्मजीवशास्त्र या विषयातील विशेषज्ञतेसह मिळवलेली विद्यापिठाची पदवी व त्यासोबत औषधउत्पादन व औषध चाचणी क्षेत्रातील आवश्यक तितक्या वर्षांचा अनुभव, या आवश्यक अर्हता होत्या. ज्या उमेदवारांकडे संशोधन प्रयोगशाळेतील औषधी द्रव्यांचे संश्लेषण व चाचणी क्षेत्रातील संशोधनाच्या अनुभवाची अतिरिक्त अपेक्षित अर्हता आहे त्यांना प्राधान्य देता येऊ शकेल.

१३. 'उत्पादन' शब्दाची व्याख्या म्हणजे एखादे औषधी द्रव्य किंवा सौंदर्यप्रसाधन विक्री किंवा वितरणाच्या उद्देशाने तयार करण्यासाठी, त्यात फेरफार करण्यासाठी, ते शोभीवंत करण्यासाठी, परिपूर्ण करण्यासाठी, त्यावर माहितीचा कागद लावण्यासाठी, ते वेगळे करण्यासाठी अथवा त्यावर प्रक्रिया करण्यासाठी किंवा त्याचा स्विकार करण्यासाठी केलेली प्रक्रिया. त्यामुळे चाचणी क्षेत्रातील अनुभवाचा संबंध हा उत्पादन प्रक्रियेशी जोडला पाहिजे, जो साहजीकच संशोधन आणि विकास प्रयोगशाळेत वस्तु (औषधी द्रव्ये व सौंदर्यप्रसाधने) तयार करून विक्रीकरिता बाजारात आणण्यापूर्वि केलेल्या चाचणी पेक्षा पूर्णपणे वेगळा असणार आहे. संशोधन आणि विकास प्रयोगशाळेतील औषधी द्रव्यांच्या चाचणी क्षेत्रातील अनुभव हा विक्रिपूर्वी

उत्पादन करण्यासाठीच्या केलेल्या चाचणी प्रकियेशी समतुल्य आहे, असे मानणे इष्ट ठरणार नाही, म्हणून ते फेटाळले पाहिजे.

१४. प्राधांन्याचा मुद्दा नमुद केलेल्या खंड ४.७ याचा अर्थ फक्त असा आहे की जर आवश्यक ती पदवी पात्रता व औषधी द्रव्यांच्या उत्पादन व चाचणी क्षेत्रातील आवश्यक कालावधीचा (वर्षांचा) प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवाराकडे, संशोधन प्रयोगशाळेतील संशोधन क्षेत्रातील विशेष, अतिरिक्त, इष्ट अनुभव असेल आणि जर इतर गोष्टी समान असतील, तर अशा उमेदवारास प्राधान्य देता येईल. केवळ उमेदवाराजवळ चाचणी विषयक संशोधन व विकास प्रयोगशाळेतील आवश्यक अनुभव आहे, म्हणजे त्याच्याकडे/ तिच्याकडे आवश्यक ती पात्रता आहे, व त्याचा/ तिचा नेमणूकीसाठी विचार केला जावा याचा त्याला/ तीला प्राधान्य हक्क प्राप्त होतो, असा जाहिरातीमधील ''प्राधांन्य'' या संज्ञेचा अर्थ लावता येणार नाही.

१५. न्यायाधिकरणाने विचारात घेतलेल्या दृष्टीकोनास **सचिव (आरोग्य), आरोग्य विभाग व एफ. डब्ल्यू (F.W.) अणि दुसरा वि.डॉ. अनीता पुरी आणि इतर,** १९९६ (६) एस्.सी.सी. (S.C.C.) २८२, या प्रकरणातील निरीक्षणात पुष्टी मिळते. त्याबाबतचे निरीक्षण खालीलप्रमाणे :—

> ''७. मान्य केल्याप्रमाणे दंतविषयक अधिकारी या पदाकरीता उमेदवारांकडून अर्ज मागवण्यासाठी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये सदर पदाकरीता कमीतकमी बी.डी.एस. (B.D.S.) ही शैक्षणिक पात्रता स्पष्टपणे नमुद केलेली होती. शिवाय, दंतवैदयक शास्त्रातील उच्च शैक्षणिक अर्हतेस प्राधांन्य देण्यात येईल असेही त्यात नमुद करण्यात आले

होते. सदर पदाकरिता आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेपेक्षा एम्.डी.एस. (M.D.S.) ही उच्च शैक्षणिक अर्हता आहे याबद्दल काहीही वाद नाही व उत्तरवादी क्र.१ यांच्याकडे सदर पदवी होती मग असा प्रश्न उद्भवतो की वरील जाहिरात, ज्याद्वारे उच्च शैक्षणिक अर्हतेला प्राधांन्य दिले गेले आहे त्यानुसार, एम.डी.एस., ही उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमदेवारास निवडीचा आणि नियुक्तीचा हक्क प्राप्त होतो का? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी असायला हवे. कारण जेव्हा एखादया जाहिरातीमधे, एखादया पदाकरिता एखादी विशिष्ट शैक्षणिक अर्हता ही किमान अर्हता म्हणून नमुद केली जाते, व पुढे उच्च शैक्षणिक पात्रतेस प्राधान्य देण्यात येईल असे नमूद केले जाते; याचा अर्थ फक्त असा होतो की सदर उच्च अर्हता प्राप्त उमेदवारास फक्त काही अंशी अधिप्रतिनिधित्व (Weightage) देण्यात यायला हवे. परंतू कल्पनाशक्ती कितीही ताणली तरी, उच्च अर्हता प्राप्त व्यक्ती आपोआपच निवडीसाठी आणि नियुक्तीसाठी हक्कदार असेल असा त्याचा अर्थ लावता येणार नाही. सदर प्रकरणाचा विचार करता, आमच्या मते, शासनाने जाहिरातीमधे उच्च अर्हताप्राप्त व्यक्तिला काही अंशी प्राधान्य मिळेल असे नमुद करूनही उत्तरवादी क्र.१ सारखी एम.डी.एस. (M.D.S.) अर्हता प्राप्त व्यक्ती निवड व नियुक्तीसाठी हक्कदार आहे असे मानण्यात

उच्च न्यायालयाने पूर्णत: चूक केली आहे. उच्च न्यायालयाचा सदर निर्णय हा पुर्णत: न टिकण्याजोगा आहे आणि म्हणूनच तो उलट फिरविणे आवश्यक आहे.

१६. म्हणून आम्ही सहाय्यक आयुक्त (औषधी द्रव्ये) आणि औषध निरिक्षक या दोन्ही पदांच्या जाहिरातीमधील अटींचा, उच्च न्यायालयाने लावलेला अर्थ उचलून धरण्यास असमर्थ आहोत. दिनांक ०४.०५.२०१७ व १७.०७.२०१७ रोजीचे उच्च न्यायालयाचे आदेश रद्द करण्यात आले आहेत. अपीले मंजूर करण्यात आली आहेत. दाव्याच्या खर्चासंदर्भात कोणताही आदेश नाही.

न्या.....
(अरून मिश्रा),

न्या.....
(नवीन सिन्हा)

नवी दिल्ली.
मे ०३,२०१९

<u>नकार (डिसक्लेमर)</u>

''या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायानिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल.''

DISCLAIMER

"The Translated judgment in vernacular language is meant for the restricted use of the litigant to understand it in his/her language and may not be used for any other purpose. For all practical and official purposes, the English version of the judgment shall be authentic and shall hold the field for the purpose of execution and implementation".

XXXXXX